पुढारी बुधवार, १२ नोव्हेंबर २०२५

# निहाली पाटीलची निवड

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील निहाली पाटीलची जम्मू-काश्मीर येथे होणाऱ्या राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांच्या विद्यमाने तथा जिल्हा क्रीडा परिषद, रत्नागिरीमार्फत एस. व्ही. जे. सी. टी. क्रीडा संकुल, डेरवण येथे १९ वर्षाखालील मुले व मुली या राज्यस्तर शालेय टेबल टेनिस स्पर्धा झाल्या. स्पर्धेत विवेकानंद कॉलेजच्या मुलींच्या संघाने द्वितीय व मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक मिळविला. यशस्वी विद्यार्थांना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्यासह क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

जनप्रवास बातम्यांचा राजा
• बुधवार
दि. १२ नोव्हेंबर २०२५

# मानव कल्याणासाठी मनशक्ती संस्थांची गरज

## शुभांगी गावडे यांचे प्रतिपादन: मनशक्तीकडून सुसंस्कारी पिढी घडवण्याचे काम

**जनप्रवास : कोल्हापूर**

मनशक्ती सारख्या संस्थांची व्यक्ती विकासातून मानव कल्याणा साठी गरज आहे, असे प्रतिपादन येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगीताई गावडे यांनी केले. लोणावळा येथील मनशक्ती प्रयोग केंद्र आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था यांच्या सहकार्याने यश शांती साठी न्यू वे या दोन दिवसीय कार्यक्रमाचा शुभारंभ प्राचार्या गावडे यांच्या हस्ते करण्यात आला.



**मनशक्ती प्रयोग केंद्र आयोजित यश शांतीसाठी न्यू वे उपक्रमाच्या उदघाटन समारंभाप्रसंगी दीपप्रज्वलन करताना प्राचार्या शुभांगीताई गावडे,प्राचार्य डॉ. रमेश कुंभार, प्रमोदभाई शिंदे, गीतेश कुलकर्णी**

संवेदनशील , कार्यक्षम, सृजनशील पिढी घडवण्यासाठी योग्य वयात संस्कार करणे गरजेचे आहेत. मनशक्ती केंद्र व्यापक संशोधनातून व्यक्ती विकासातून राष्ट्र आणि मानव कल्याणासाठी जे काम करत आहे. यावेळी डॉ. रमेश कुंभार यांचे भाषण झाले.

केंद्राचे कार्यकारी विश्वस्त प्रमोद शिंदे यांनी मनशक्ती व्यक्ती, कुटुंब, राष्ट्र मानवता कल्याणासाठी सशक्त, सुसंस्कारी पिढी घडवण्याचे काम करत असल्याचे सांगितले.

यामध्ये निराधार एक पालकत्व स्थलांतरीत गरीब गरजू मुले यांच्या शिक्षणाबद्दल काम करणारी संस्था उमेद फाऊंडेशन सांगरूळ आणि बौद्धिक अक्षम मुलांसाठी तसेच अन्य दिव्यांग मुलांसाठी तसेच महिला सक्षमीकरणासाठी काम करणारी संस्थाशाम कमल चॅरिटेबल ट्रस्ट या दोन संस्थांचा सन्मान करण्यात येणार आहे. या केंद्राचे साधक दीपक आलूरकर,गीतेश कुलकर्णी, मयूर चंदने,सुहास गुधाटे, कोल्हापूरचे साधक शिवाजी पाटील यांच्यासह १०० हून अधिक साधक कार्यरत आहेत.

हॅलो प्रभात

# 'विवेकानंद'च्या कु.निहाली पाटील ची टेबल टेनिस स्पर्धेसाठी निवड

कोल्हापूर : हॅलो प्रभात



रत्नागिरी येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेत विवेकानंद कॉलेजच्या मुलींच्या संघाने द्वितीय, तर मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेतून इयत्ता ११ वी सायन्सची कु. निहाली निवास पाटील हिची जम्मू-काश्मीर येथे होणाऱ्या राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली असून तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.संघातील खेळाडूंना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, तसेच प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. संतोष कुंडले, डॉ. विकास जाधव व जिमखाना विभागातील प्राध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले.



12.11.25

दैनिक जनप्रवास

बुधवार, दि. १२ नोव्हेंबर २०२५

# डॉ. कुंभार हे माणसांना घडविणारे व्यक्तिमत्व

## स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे प्रतिपादन




**सेवागौरव सदिच्छा समारंभात प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचा सत्कार करताना संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे. सोबत डॉ. बी. एम. हिर्डेकर आदी.**

जनप्रवास : कोल्हापूर

शैक्षणिक क्षेत्रात प्राध्यापक व प्राचार्य म्हणून ३९ वर्षे सेवा बजावणारे प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या कराड, कडेपूर, सातारा, तासगाव, इचलकरंजी आणि विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे आपल्या उत्तम प्रशासनाच्या जोरावर आणि दूरदृष्टीतून येथील महाविद्यालयांचा विकास केला. माणसांना जपणारे आणि घडविणारे व्यक्तिमत्व म्हणून प्राचार्य डॉ. आर.आर.कुंभार यांना ओळखले जाते, असे प्रतिपादन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या सेवागौरव सदिच्छा समारंभात ते बोलत होते.

विवेकानंद कॉलेजच्या वतीने प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचा शाल, श्रीफळ, मानपत्र, आहेर, श्री महालक्ष्मीची मुर्ती देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला.

यावेळी साळुंखे म्हणाले, जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास, सहनशिलता, विनम्रता, उत्तम नेतृत्व गुण, हाडाचे शिक्षक, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक, प्राचार्य, उत्तम प्रशासक, व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांची जाण, कौटुंबिक सुखदुःखात आधार देणारे आधारवड, शिस्तप्रिय, महत्वाकांक्षी असे त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे.

विवेकानंद कॉलेजला यशाच्या शिखरावर पोहोचविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी प्राचार्य डॉ. कुंभार यांना शुभेच्छा दिल्या. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचा विचार अंगिकारुन प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार यांनी प्रशासनात आपला ठसा उमटविला आहे. त्यांनी शैक्षणिक गुणवत्तेच्या वाढीबरोबरच महाविद्यालयांचा भौतिक विकास करण्यावरसुध्दा भर दिला. माणसं पारखण्याची दूरदृष्टी त्यांना लाभली आहे.

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डॉ. आर.आर.कुंभार म्हणाले, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमुळे माझी ओळख निर्माण झाली आहे. मला संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा खंबीर पाठिंबा होता. त्यामुळेच शिक्षणक्षेत्रात मुक्तपणे यशस्वी वाटचाल करु शकलो. संस्थेने ज्या ज्या ठिकाणी मला सेवेची संधी दिली, त्या शाखांचा परिपूर्ण अभ्यास करुन तेथील शैक्षणिक व भौतिक सुविधांचा विकास केला.

संस्थेच्या कोल्हापूर जिल्हयाचे विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ.सतिश घाटगे, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष हितेंद्र साळुंखे, प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील, माजी आमदार भगवानराव साळुंखे, प्रा. जे. के. पाटील, डॉ. एकनाथ आळवेकर, डॉ. संजय लठ्ठे, डॉ. डी. आर. तुपे, प्रा. एम. आर. नवले, डॉ. वर्षा शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. एस. पी. थोरात यांनी केले. आभार प्रा. शिल्पा भोसले यांनी मानले.

सुत्रसंचालन डॉ. सुप्रिया पाटील यांनी केले. मानपत्राचे वाचन प्रा. अविनाश गायकवाड यांनी केले. याकार्यक्रमाला शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.